# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ,जळगांव

**केंद्रीय सामाईक प्रवेश प्रक्रिया (एम.एस.डब्ल्यु ) -२०१९**

# सुचना

- प्रवेश प्रक्रिया दि.२३ जूलै २०१९ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळा येथे सुरु होईल. सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर हजर रहावे. कुठल्याही कारणास्तव येण्यास विलंब झाल्यास होणा-या नुकसानास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.
- विद्यार्थ्यांने स्वत:ची आवश्यक ती मुळ शैक्षणिक कागदपत्रे प्रवेशाच्या वेळी सादर करावीत. प्रथम /द्वितीय/ तृतीय वर्ष पदवी गुणपत्रक, १० वी व १२ वी गुणपत्रक इ.
- आरक्षित जागांवर प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे-उदा.जात प्रमाणपत्र ,जातवैधता प्रमाणपत्र ,नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२० पर्यंत वैध असलेले ) अपंगत्व दाखला, माजी सैनिक प्रमाणपत्र इ.सादर करणे आवश्यक राहील.
- प्रथम फेरीत विद्यार्थ्यास Allot करण्यात आलेल्या महाविद्यालयातील प्रवेश संबधीत विद्यार्थ्यांने किमान रु ५००/- (रु. पाचशे मात्र /-) त्याच दिवशी जमा करुन प्रवेश निश्चित (Spot Admission) करावा . अन्यथा त्याचा प्रवेशाचा दावा संपुष्टात येईल.
- विद्यार्थ्यांने ज्या महाविद्यालयात (Spot Admission) प्रवेश निश्चित केला असेल त्यांनी अंतीम प्रवेश निश्चीत करण्याकरीता संबधीत महाविद्यालयात/विद्यापीठात आवश्यक मुळ कागदपत्रे दि.२५ जूलै २०१९ सांय. ४ वाजेपर्यंत जमा करावीत अन्यथा विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.
- प्रथम फेरीस विद्यार्थी कुठल्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास किंवा कुठल्याही कारणास्तव प्रवेश रद्द झाल्यास सदर विद्यार्थ्यांस दुस-या फेरीत सहभागी होता येणार नाही याची नोंद घ्यावी.
- जर गुणवत्ता यादीतील क्रम (Same Merit) सारखा असेल तर प्रवेशासाठी विद्यार्थ्याची निवड त्याच्या पदवी परीक्षेतील गुणांवर आधारीत राहिल. त्यातहि साम्य असल्यास एच.एस.सी. तद्नंतर एस.एस.सी चे गुण ग्राहय धरले जातील.